**विनोद तावडे**

मंत्री

शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण
मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

सत्यमेव जयते

दिनांक : ०५.०८.२०१६

विषय : आपल्या महाविद्यालयातील मराठी वाङ्.मय मंडळाचे अभिनंदन!

आपला जेव्हा इतर भाषांशी संबंध येतो, त्याच वेळी आपल्या मातृभाषेविषयी प्रेमाची जाणीव आपल्याला होते. महाविद्यालयीन जीवन हे उर्जामय आणि उत्साही असते. अनेक नवनवीन उपक्रम युवकांना खुणावत असतात. उत्साह ओसंडून वाहत असतो.

माय-मराठीचा अभिमान बाळगून अनेक महाविद्यालयांतील मराठी वाङ्.मय मंडळे कल्पकतेसह कार्यरत आहेत. आपलेही महाविद्यालय यासंबंधात अत्यंत क्रियाशील आहे, असे वर्तमानपत्रातील बातमीद्वारे समजले, खूप आनंद झाला. विविध अभिनव उपक्रमांद्वारे मराठी भाषेच्या विकासात योगदान देण्याचा आपला हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. महाविद्यालयीन युवक-युवती हेच खऱ्या अर्थाने मराठी भाषा विकासाचे दूत आहेत.

भविष्यातही आपण अशाच पद्धतीने मराठी भाषेला महाविद्यालयांतील सर्व व्यवहारांत सार्थ प्राधान्य द्याल, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. शासनाचा मराठी भाषा दिन, वाचन प्रेरणा दिन, मराठी भाषा पंधरवडा अशा अनेक उपक्रमांत आपला सहभाग असेलच. आपल्या महाविद्यालयाच्या मराठी वाङ्.मय मंडळाच्या कार्यात सहभागी होणाऱ्या उत्साही प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा! तसेच आपल्या पुढील वाटचालीसाठी अभिष्ट शुभचिंतन!

आपला,

विनोद तावडे

**(विनोद तावडे)**

प्रति,
मा. प्राचार्य

कार्यालयीन पत्ता : १०८, पहिला मजला, विस्तारित इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
टेलि/फॅक्स क्रमांक : ०२२-२२०२ ९७४२/२२०२ ७१७४ (का.), ०२२-२२८७ १९७०/२२८७ ३५७२ (नि.), ई-मेल : *ministervinodtawde@gmail.com*